महाराष्ट्र शासन
मत्स्यव्यवसाय विभाग
आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
यांचे कार्यालय मित्तल टॉवर, सी-विंग, सी-२४, दुसरा मजला, नरिमन पॉईंट, विधानभवनजवळ मुंबई-४०००२१
GOVERNMENT OF MAHARASHTRA
DEPARTMENT OF FISHERIES
COMMISSIONER OF FISHERIES, MAHARASHTRA STATE, MUMBAI.
Mittal Tower, C-Wing, 24, Second floor, Nariman Point, Vidhanbhavan Near, Mumbai-400021
Email -:commfishmaha@gmail.com Website -: http://fisheries.maharashtra.gov.in

जा.क्र. मत्स्य/०५३१०१/७४७/२०२४-२५ (भाग-२) दिनांक- ११/०५/२०२६

आदेश :

वाचा:- १. केंद्र शासन आदेश नस्ती क्र.j-२१०३०३५/१/२०२६-Fy(E-२७५९४) दि.१६/०३/२०२६
२. शासन आदेश क्र. मत्स्यवि-१११५/प्र.क्र.१३७/पदुम-१४, दि.०१/०६/२०१५.

भारताच्या पूर्व किनारपट्टीवर मान्सुनचे आगमन लवकर होत असल्याने या किनारपट्टीवर मासेमारी बंदी कालावधी दि.१५ एप्रिल २०२६ ते दि.१४ जुन २०२६ (दोन्ही दिवस धरुन) तसेस पश्चिम किनारपट्टीवर मान्सुनचे आगमन उशिरा होत असल्याने पश्चिम किनारपट्टीवर मासेमारी बंदी कालावधी दि.१ जुन २०२६ ते दि.३१ जुलै २०२६ (दोन्ही दिवस धरून) या कालावधीत विशेष आर्थिक क्षेत्रात (EEZ) पावसाळी मासेमारी बंदी घोषीत केलेली असल्याचे केंद्र शासनामार्फत दि.१६/०३/२०२६ रोजीच्या आदेशान्वये कळविण्यात आलेले आहे. (प्रत सलग्न करण्यात येत आहे).

मासळीच्या साठ्याचे जतन तसेच मच्छीमारांची जिवीत व वित्त यांचे रक्षण करण्याच्या हेतुने महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ च्या कलम ४ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, उक्त कलम ३ अन्वये रचना केलेल्या सल्लागार समितीशी विचार विनिमय करून शासन आदेश दि.१ जुन २०१५ अन्वये १ जुन ते ३१ जुलै (दोन्ही दिवस धरून) राज्याच्या जलधी क्षेत्रात पावसाळी मासेमारी बंदी कालावधीचे नियमन करण्यात आलेले असून सदरच्या आदेशान्वये परवानाधारक बिगर-यंत्रचलित नौकांस मासेमारीची मुभा दिलेली आहे.

या कालावधीत मासळीच्या जिवांना प्रजोत्पादनास पोषक वातावरण असते. या कालावधीत मासेमारी बंदीमुळे मासळीच्या बीज निर्मिती प्रक्रियेस वाव मिळुन मासळीच्या साठयाचे जतन होते. तसेच या कालावधीत खराब /वादळी हवामानामुळे होणारी मच्छीमारांची जिवीत व वित्त हानी मासेमारी बंदीमुळे टाळता येणे शक्य होते. सबब, मासळीच्या साठयाचे जतन तसेच मच्छीमारांचे जिवीत व वित्त यांचे रक्षण या हेतुने या वर्षी दि.१ जुन २०२६ ते दि.३१ जुलै २०२६ या कालावधीत (दोन्ही दिवस धरून) राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात (सागरी किनाऱ्यापासुन १२ सागरी मैलापर्यंत) यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकांस पावसाळी मासेमारी बंदी लागू करण्यात येत आहे, याची सदर आदेशान्वये नोंद घ्यावी.

१. सदर पावसाळी मासेमारी बंदी यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकांना लागू राहील.
२. सदर पावसाळी मासेमारी बंदी ही पारंपारिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या बिगर-यंत्रचलित मासेमारी नौकांना लागु राहणार नाही.
३. समुद्रात मासेमारीसाठी गेलेल्या सर्व यांत्रिक व यंत्रचलित मासेमारी नौका दि.०१ जुन २०२६ पुर्वी मासेमारी बंदरात परतणे बंधनकारक आहे. तसेच दि.३१ जुलै २०२६ व त्यापुर्वी समुद्रात मासेमारीकरीता जाता येणार नाही, याची नोंद घ्यावी.
४. राज्याच्या सागरी जलधी क्षेत्राबाहेर (सागरी किनाऱ्यापासुन १२ सागरी मैलापुढे) खोल समुद्रात मासेमारीस जाणाऱ्या नौकांस केंद्र शासनाच्या खोल समुद्रातील मासेमारीबाबतचे धोरण / मार्गदर्शक सुचना/आदेश लागु राहतील.
५. राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात (सागरी किनाऱ्यापासुन १२ सागरी मैलापर्यंत) यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौका पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत मासेमारी करतांना आढळल्यास / केल्यास महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम (सुधारणा), २०२१ च्या कलम १४ अन्वये नौका व नौकेवर बसविलेली

उपसाधनासह मासेमारी सामुग्री आणि त्यामध्ये सापडलेली मासळी जप्त करण्यात येईल तसेच कलम १७ मधील तरतुदी अन्वये जास्तीत जास्त कठोर शास्ती लादण्यात येईल.

६. पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत मासेमारी करतांना यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकेस अपघात झाल्यास अशा नौकेस शासनाकडुन कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मिळणार नाही.

७. पावसाळी बंदी कालावधीमध्ये राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात मासेमारी नौकास अवागमन निषिध्द आहे.

राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात (सागरी किनाऱ्यापासुन १२ सागरी मैलापर्यंत) पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकेने बेकायदेशीर मासेमारी न करणेबाबत आपले अधिनस्त सर्व मच्छीमार सहकारी संस्थास अवगत करावे तसेच बंदी कालावधीत आपल्या कार्यक्षेत्रात यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकेने बेकायदेशीर मासेमारी केली जाणार नाही / पावसाळी मासेमारीचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

सहपत्र-वरीलप्रमाणे

प्रेरणा देशभ्रतार (भा.प्र.से.)
आयुक्त मत्स्यव्यवसाय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहितीस्तव तथा उचित कार्यवाहीस्तव-

१) प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय, कोकण विभाग, मुंबई.

२) सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय,
पालघर/ठाणे/मुंबई उपनगर/मुंबई शहर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग

यांना सुचित करण्यात येते की, आपले अधिनस्त सर्व मच्छीमार सहकारी संस्था तसेच मच्छीमार संघ यांना सांक्षांकित प्रत देवून सदर आदेश त्यांच्या निदर्शनास आणुन द्यावे. समुद्रात मासेमारीसाठी गेलेल्या सर्व यांत्रिक व यंत्रचलित मासेमारी नौका दि.०१ जुन २०२६ पुर्वी मासेमारी बंदरात परतणे बंधनकारक असुन दि.१ जुन २०२६ रोजी व त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत नौकांना मासेमारी बंदारात मासे उतरविण्यास परवानगी असणार नाही. त्यामुळे सर्व संबंधित नौका दि. ३१ मे २०२६ रोजी वा तत्पुर्वी बंदरात पोहचतील याबाबत संबंधितास सुचित करावे. ज्या यांत्रिक व यंत्रचलित मासेमारी नौकामार्फत पावसाळी मासेमारी बंदी कालावधीचा भंग करुन मासेमारी केल्याचे निदर्शनास येतील, अशा नौकांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम (सुधारणा), २०२१ अंतर्गत कठोर कार्यवाही करण्यात यावी. तसेच पावसाळी मासेमारी हंगाम हा प्रामुख्याने सागरी मत्स्य संपदेच्या प्रजननाचा हंगाम असतो त्यामुळे दि.१ जुन २०२६ ते दि.३१ जुलै २०२६ (दोन्ही दिवस धरून) या ६१ दिवसांचा पावसाळी मासेमारी बंदी कालावधीची योग्यरित्या अंमलबजावणी करणे हे सर्वांचे कर्तव्य आहे. यास्तव पावसाळी मासेमारी बंदी कालावधीबाबत प्रत्येक मासळी उतरवण्याच्या ठिकाणी पोस्टरद्वारे, भिंतीपत्रकाद्वारे, बॅनरद्वारे तसेच गावात दवंडी देऊन योग्य ती जनजागृती करण्यात यावी. याचबरोबर प्रसिध्दी माध्यमाद्वारे विस्तृत प्रसिध्दी देऊन बंदी कालावधीत आपल्या कार्यक्षेत्रात यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकेने बेकायदेशीर मासेमारी केली जाणार नाही/पावसाळी मासेमारी बंदीचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

३) मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी, सातपाटी/वसई/वर्सोवा/अलिबाग/रत्नागिरी/मालवण

४) उपनिबंधक सहकारी (मत्स्य), आयुक्त कार्यालय, मुंबई.

५) सर्व परवाना अधिकारी

प्रत माहितीसाठी सविनय सादर-

१) मा. सचिव (पदुम), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई

२) जिल्हाधिकारी, पालघर/ठाणे/मुंबई उपनगर/मुंबई शहर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग

३) विशेष पोलिस महानिरीक्षक (सुरक्षा व सागरी सुरक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई

४) अध्यक्ष, मुंबई पोर्ट ट्रस्ट, मुंबई

५) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाइम बोर्ड, मुंबई

६) पोलिस आयुक्त, नवी मुंबई

फाईल सं/File No: j-2103035/1/2026-Fy (E- 27594)
भारत सरकार/Government of India
मत्स्यपालन, पशुपालन और डेयरी मंत्रालय
Ministry of Fisheries, Animal Husbandry and Dairying
मत्स्य पालन विभाग / Department of Fisheries
*****

कृषि भवन /Krishi Bhawan
नई दिल्ली/New Delhi – 110001
दिनांक/:Date: 16th March, 2026

## ORDER

In pursuance of Rule 14 (e) of the Sustainable Harnessing of Fisheries in the Exclusive Economic Zone Rules, 2025, under the Territorial Waters, Continental Shelf, Exclusive Economic Zone and Other Maritime Zones Act, 1976, the President of India is pleased to impose a uniform ban on fishing by all fishing vessels **in the Indian Exclusive Economic Zone (EEZ) beyond territorial waters** on the East Coast [including West Bengal, Odisha, Andhra Pradesh, Puducherry, Tamil Nadu, Andaman, & Nicobar Islands] and West Coast [including Gujarat, Daman & Diu, Karnataka, Goa, Maharashtra, Kerala, Tamil Nadu and Lakshadweep Islands] as per period mentioned below for conservation and effective management of fishery resources and also for sea safety reasons:

**East Coast-from 15th April to 14th June 2026 (both days inclusive) (61 days)**

**West Coast-from 1st June to 31st July 2026 (both days inclusive) (61 days)**

The traditional non-motorized units shall be exempted from this uniform fishing ban imposed in the Indian EEZ beyond territorial waters.

This issues with the approval of the Competent Authority.

**(Dr. Sanjay Pandey)**
Deputy Commissioner (Fisheries)

डॉ. संजय पाण्डेय
Dr. SANJAY PANDEY
उप आयुक्त (मा.)/Deputy Commissioner(Fy.)
भारत सरकार/Govt. of India
मात्स्यिकी पशुपालन एवं डेयरी मंत्रालय
Min.of Fisheries,Animal Husbandry & Dairying
मत्स्य पालन विभाग
Department of Fisheries
...न, नई दिल्ली-110001
Krishi Bhawan, New Delhi-110001

To,

1. The Secretary (Fisheries), All Maritime States/Union Territories.
2. The Chairman, All Major Port Trust: The ban order may please be served on all the companies operating deep sea fishing vessels from the port.
3. Directorate General of Shipping, 9th Floor Beta Building, i-Think Techno Campus, Kanjurmarg (East), Mumbai with a request to notify all registrars of fishing vessels in the East & West Coasts, including UTs of A&N Islands, Puducherry & Lakshadweep Islands and DNH, Daman & Diu.
4. Director (Ops), Coast Guard Headquarters, National Stadium Complex, New Delhi.
5. Director General, FSI, Mumbai/Director NIFPHATT/CIFNET, Kochi.
6. Director, CMFRI, Post Box No. 1603, Ernakulum North PO, Kochi-682 018.
7. Officer-In-charge, NIC, DoF, MFAH&D, Krishi Bhavan, New Delhi.
8. Chairperson, National Fishworkers Forum (NFF), The SFSS Soc. Ltd, Satpati Post, Tal, Palghar District, Maharashtra, Email: nff@nffindia.org, rpatilnarendra@gmail.com.

**(Dr. Sanjay Pandey)**
Deputy Commissioner (Fisheries)
Tel. 011-23070279